# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 17/06/2021 (गुरूवार)

---

### चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावरील कुही येथे दिनांक 16/06/2021 चे 12.00 वा. ते 12.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बाबुराव नामदेव भिवगडे, वय 47 वर्ष, रा.सिल्ली, ता.कुही, जि.नागपुर हे त्यांची एमएच– 40/ एम– 8425 क्रमांकाच्या हिरोहोंडा फॅशन मोटरसायकलने लक्ष्मी मंगल कार्यालय, कुही येथे त्यांचे गावातील जयराम भिवगडे यांचे मुलीचे लग्नाकरीता गेले होते. लग्न लागल्यानंतर फिर्यादी हे जेवण करीत असतांना त्यांची मंगल कार्यालय, कुही येथे बाहेर लावलेली कि. 47,000/–रू. ची मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेत असल्याचे लोकांच्या ओरडण्याचा आवाजा वरून माहीत झाल्याने आरोपी नामे– गजानन श्रावण हलाले, वय 25 वर्ष, रा. तारणा ता.कुही, जि.नागपुर यास ताब्यात घेवून त्याला पोलिस स्टेशन कुही येथे पुढील कार्यवाही करीता त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर प्रकरणी फियादी नामे– बाबुराव नामदेव भिवगडे, वय 47 वर्ष, रा. तारणा, ता. कुही, जि. नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 379, 511 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि अनिल देरकर हे करीत आहे.

### दुखापत

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 08 कि. मी अंतरावर पारडी घटाटे येथे दिनांक 16/06/2021 चे दिनांक 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुखदेव शिवराम ईटनकर वय 32 वर्षे रा. वकील परसोडी त.कळमेश्वर हा अनिल मंजुळकर याला ब्रेकर मशिन मागण्याकरीता गेला होता. त्यावेळी तेथे आरोपी क्र 1) रतन मारोती मंजुळकर, वय 38 वर्ष, रा. ब्राम्हणी वार्ड क्र. 1 हा आला व फिर्यादीला म्हणाला की, ''उधारीचे पैसे का दिले नाही'' या कारणावरून आरोपी क्र. 1 याने फिर्यादीची कॉलर पकडुन डावे गालावर हातबुक्कीने मारून जखमी केले. फिर्यादी घाबरून तिथुन जात असता आरोपी क्र 2) राजा मंजुळकर वय 28 वर्ष रा. ब्राम्हणी वार्ड क्र. 1 याने त्याला पकडुन हातात दगड घेवुन फिर्यादीचे डोक्याचे मागील भागास मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ मोरेश्वर नागपुरे मो. नं 8888821360 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि. मी अंतरावर वाढोणा चौधरी येथे दिनांक 16/06/2021 चे दिनांक 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– धनराज श्यामराव कुरडकर वय 42 वर्ष, रा. वाढोणा हा धापेवाडा वरून वाढोणा बु येथे चौधरी याचे शेताजवळ आला असता तेथे गावातील बाल्या चौधरी तेजराम राउत बसले होते. तेव्हा फियादी थांबला तेथील लोकांसोबत मज्जाक करीत होता. तेवढयाच आरोपी नामे– राकेश खेमराज राउत वय 38 वर्ष, रा वाढोणा हा आला व त्याने फियादीला विनाकरण त्याच्या जवळील लोखंडी पावडयाने फियादीच्या उजव्या हाताच्या ढोपरयावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रूढे मो नं 9923312397 हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. खापखेडा :– सप्टेंबर 2020 ते जानेवारी 2021 पर्यंत 18 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि माहे 2020 मध्ये खापरखेडा दुकानात काम करीत असता तिचेसह आरोपी नामे– मोनु उर्फ सनि संतलाल गौतम, वय 21 वर्षे, रा. वलनी खापरखेडा याने जवळीक निर्माण करुन फिर्यादी नाबालीक असल्याचे माहीत असतांना तिचेवर वारंवार बलात्कार केला. परंतु फिर्यादीला वडील नसल्याने फिर्यादीने घरच्यापासून लपविली व तिने माहे जानेवारी 2021 पासून आरोपीशी संपर्क तोडला. फिर्यादीचा आईने फिर्यादीचे लग्न दि. 10.03.2021 रोजी करुन दिले लग्नानंतर माहे मे 2021 मध्ये फिर्यादी ही सात महिन्यची गरोदर आहे असे डॉक्टरांनी तपासून सांगितल्याने तिचे पतिने फिर्यादीला माहेरी आणुन सोडले. त्यानंतर फिर्यादीने दि. 10/06/2021 रोजी मुलीला जन्म देवून मुलीचे पालनपोशना करीता मातृ सेवा संघ येथे दिल्याचे पोस्टे अजनी नागपूर शहर येथील रिपोर्ट व पोस्टे खापरखेडा येथील बयानावरुन सदर गुन्हा नोद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2)(एन) भादंवि., सहकलम 6 लैगिंक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि मलकुवार मो न. 9623687627 या करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत खैरगाव येथे दिनांक 01/06/2021 चे 02.00 वा. दरम्यान श्रीमती कमला भाउरावजी वानखेडे(मृतक), वय 68 वर्ष रा. खैरगाव या त्यांचे राहते घरी खालीमध्ये एकटयाच हजर असतांना त्यांनी अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. त्यांची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता मेडीकल कॉलेज, नागपूर येथे भरती केले असता त्यांचा मृत्यू झाला. संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राजेश माकडे, मेडीकल बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार मसराम 9422547052 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर